॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील 'केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अ‍ॅण्ड लिंकेजेस' (KCIIL) च्या माध्यमातून नाविन्यपूर्ण संकल्पनांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी **'KCIIL X-lerate' (कोहोर्ट १०.०)** या विशेष इनक्युबेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माहितीपत्रकाचे अनावरण विद्यापीठाचे कुलगुरू **प्रा. विजय एल. माहेश्वरी** यांच्या हस्ते नुकतेच उत्साहात पार पडले.

या प्रसंगी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, केसीआयआयएलचे संचालक सीए. रवींद्र पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नविन बी. खंडारे, इन्क्युबेशन मॅनेजर अनिकेत पठाडे, पोर्टफोलिओ मॅनेजर योगेश पाटील, कार्यक्रम समन्वयक रोशनी जैन तसेच लेखा व प्रशासन अधिकारी चैतन्य मनुधणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनावरण प्रसंगी कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी आवाहन केले की, जास्तीत जास्त विद्यार्थी, प्राध्यापक आणि नवउद्योजकांनी आपल्या नवकल्पनांची नोंदणी या उपक्रमात करावी. निवड झालेल्या स्टार्टअप्सना / नवकल्पनांना केसीआयआयएलतर्फे विशेष **इनक्युबेशन सपोर्ट, सीड फंडिंग (भांडवल) मिळवण्यासाठी साहाय्य, अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन (मेंटरशिप) आणि नेटवर्किंगच्या संधी** उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

स्टार्टअप इकोसिस्टमला अधिक सक्षम करणे हा या कोहोर्ट १०.० चा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक नवउद्योजकांनी इनक्युबेशन सेन्टरच्या अधिकृत संकेतस्थळाला (https://kciil-kbcnmu.in/) भेट देऊन आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन केसीआयआयएलच्या व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ९ एप्रिल, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता